**Press Clippings**

| Publication | Edition | Date | Page Number | |
|---|---|---|---|---|
| Kesari | Pune + Mumbai | 25/4/15 | 3 | |
| | | | | |

# अल्ट्रा मीडिया पुरवणार मराठी चित्रपटांना थ्रीडी सुविधा



**पुणे** : मराठी चित्रपट निर्मात्यांना जागतिक दर्जाच्या विशेष उच्च प्रतीच्या त्रिमिती सुविधा देण्याच्या उद्देशाने अल्ट्रा मीडिया आणि एन्टरटेन्मेन्ट यांच्या वतीने मराठीत त्रिमिती चित्रपटांच्या निर्मितीला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. या अंतर्गत अल्ट्रा मीडियाची शाखा असलेल्या अल्ट्रा स्टुडिओज आणि डिजीटल स्टुडिओच्या माध्यमातून मराठी चित्रपट निर्मात्यांना थ्रीडी चित्रपट बनविण्याच्या सुविधा सवलतीच्या दरात देण्यात येणार आहेत.



स्टुडिओमध्ये स्थानिक सॉफ्टवेअर वापरून नेहमीच्या चित्रपटांचे त्रिमितीत रुपांतर केले जाईल, विश्लेषणात्मक मापन आणि सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन वाढवणे, विशेष थ्रीडी डायरेक्टर कॅमेरे भाडे तत्वावर पुरवणे, चित्रपटांचे दिग्दर्शन आणि सहाय्यतेसाठी उत्तम तांत्रिक ज्ञान असणारे त्रिमितीय तंत्रज्ञान पुरवणे आदी सेवा पुरविण्यात येतील.

याबाबत बोलताना अल्ट्रा मीडियाचे सुशील अग्रवाल म्हणाले, मराठीमध्ये त्रिमिती चित्रपट खूप कमी बनतात. तरुण चित्रपटकर्ते विविध समकालीन आणि चौकटीबाहेरच्या विषयांवर दर्जेदार चित्रपट बनवत आहेत. त्यांना वेगळा प्रेक्षकवर्गदेखील आहे. त्यामुळे अल्ट्राने अनेक राष्ट्रीय, तसेच आंतरराष्ट्रीय प्रकल्पांसाठी ही सुविधा पुरवली आहे.